काव्य
२६१८



# हृद्गत

प्रातिनिधीक
काव्यसंग्रह

REFBK-0026276
REFBK-0026276

'कलासागर' जंजिरा - मुरुड रायगड, पुष्प १ ले



# हृद्गत

## प्रातिनिधीक काव्यसंग्रह

REFBK-0026276

'कलासागर' जंजिरा - मुरुड रायगड, पुष्प १ ले

प्रकाशक :-
**मदनदादा म. हणमंते**
अध्यक्ष,
**'कलासागर'**
जंजिरा - मुरूड, रायगड

सुजाता प्रकाशन, मुरूड

सर्व हक्क :-
प्रकाशकाचे स्वाधीन

मुद्रक :-
**मदन आर्ट प्रिंटरी**
जंजिरा - मुरुड, रायगड

प्रकाशन :-
**दिनांक ३० डिसेंबर १९९०**

देणगी मुल्य :-
**पंधरा रूपये**

# दोन शब्द .........

**प्रिय काव्य रसिक हो !**

प्रतिभेच्या मखमली बिछान्यावर कल्पना आणि विचार यांच्या उत्कट मिलनाची घटना घडते, अर्थ-अनर्थाच्या गुणसुत्रांची सांगड जुळून एका सार्थ गर्भाची निर्मिती होते, जोपासना होते ! अन् एक गर्भीत अन्वयार्थ घेऊन निसटत्या क्षणी जी जन्माला येते, तिचेच नांव 'कविता !' तिच्या जन्मदात्या माय-पित्यांचे **'हृद्गत'** म्हणजेच कलासागरचा प्रातिनिधीक काव्यसंग्रह !

अमृतातेही पैजा जिंकू म्हणणाऱ्या संत **ज्ञानेश्वर** यांची सप्तशताब्दि, कवितेला खऱ्याअर्थानें हिरवेपण देणाऱ्या बालकवी **त्र्यंबक बापूजी ठोंबरे** यांची जन्मशताब्दि, युगपुरूष डॉ. **बाबासाहेब आंबेडकर** जन्मशताब्दि, महात्मा **ज्योतिबा फुले** स्मृती शताब्दि अशा मणिकांचन योगाने प्रकाशित होणारा हा काव्याचा आगळावेगळा साज सकल रसिकांच्या चित्तवृत्तीस समाधान देईल असा आम्हाला विश्वास वाटतो !

आमच्या प्रथम काव्यपुष्प निर्मितीमध्ये आम्हाला हार्दिक सहकार्य करणाऱ्या सकल मान्यवर कवी-साहित्तिक, जाहिरातदार, हितचिंतक आदिंचें मनस्वी आभार !

धन्यवाद !

संपादकीय मंडळ

श्री. **सुरेश द. उपाध्ये**

सौ. **मंगला द. कारखानीस**

श्री. **अरूणकुमार ढावरे**

श्री. **अभय ज. पैर**

श्री. **मदनदादा म. हणमंते**

**धन्यवाद :-**

प्रस्तावना :-

श्री. **परेन जांभळे**, कवी

मुख्य सहसंपादक दैनिक **नवशक्ति**, मुंबई

प्रतिसाद :-

**या हृद्गत काव्य संग्रहातील सकल कविवर्य**

शुभेच्छा :-

**जाहीरात रूपानें शुभेच्छा व्यक्त करणारे सुहृद**

बक्षिसे :-

स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा मुरूड-जंजिरा

**रामचंद्र शहासनें**, प्रबंधक

सहभाग :-

श्री. **क. ज. नागवेंकर तहसिलदार मुरूड**

श्री. **मनोहर बहिलें**, **नगरसेवक मुरूड**

**प्रा. देवदत्त तुंगार**, रोहा — **वसंतभाऊ चौलकर**, अलिबाग

**नागेश कुळकर्णी**, अलिबाग — श्री. **रमेश पाटील**, अलिबाग

श्री. **भाई दांडेकर** अध्यक्ष जंजिरा विद्या मंडळ मुरूड

श्री. **कृ. म. आरेकर**, नगराध्यक्ष मुरूड — **यशवंत गो. बेडेकर**

आणि उत्स्फूर्ततेनें सहकार्य करणारे इतर अनेक हितचिंतक

या सर्वांना मनःपूर्वक धन्यवाद !

**कलासागर कार्यकारिणी**

अध्यक्ष :- मदनदादा हणमंते — कार्याध्यक्ष :- सुरेश द. उपाद्ये

उपाध्यक्ष :- दिलीप लोखंडे — कोषाध्यक्ष :- विमल गुप्ते

सेक्रेटरी :- किरण बाथम — सहसेक्रेटरी :- संजय गुंजाळ

**सदस्य**

सौ. मंगला कारखानीस

अभय पैर — बाळकृष्ण गोंजी — प्रकाश सदरे — विजय पैर

देवेंद्र मसाल — प्रकाश वाडकर — समीर करंबे — शैलेश पालशेतकर

# प्रस्तावना

'**कलासागर**' जंजिरा - मुरूड, ही सामाजिक बांधिलकी डोळ्यासमोर ठेवून नाटय, साहित्य आदि क्षेत्रांत कार्यरत असलेली आणि नवोदितांना व्यासापिठ मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील असणारी संस्था असून साहित्य क्षेत्रातील तिचे पहिले - वहिले पाऊल म्हणजेच **हृद्गत** या प्रतिनिधीक काव्य संग्रहाची निर्मिती !

प्रतिभावंताला साधना आणि प्रतिक्षा यांची नितांत आवश्यकता असते. प्रतिभेचे देणें हे देवदत्त असते हे विधान काही अंशी सत्य मानावेच लागेल कलावंताचे साद - प्रतिसादाशी अतुट नाते असते अनाम नादाने अव्यक्त स्वरूपात घातलेली साद कलावंत शब्द - स्वर या माध्यमातून व्यक्त करतो अर्थात प्रत्येक जण प्रतिभावंत असतोच असे नाही.

शैले शैले न माणिक्यम ।
मौतिकम न गजे गजे ।।
सज्जनां नहि सर्वत्र ।
चंदनम् न वने वने ।।

सोने देखील अनेक सत्वपरिक्षांतून गेल्यानंतरच बावनकशी ठरते. त्या प्रमाणे प्रतिभावंताला अनेक कसोटयांतून जावे लागते. कालचा नवोदित हा आजचा नामवंत असू शकतो, पण नवोदितांनी प्रस्थापित होणें हे कलेचे अंतिम ध्येय असू शकत नाही. तरीही कलासागर संस्थेचे नवोदितांद्वारे व्यक्त होणारे **हृद्गत** ही अभिनंदनीय बाब आहे.

**कलासागरचे हृद्गत** व्यक्त होते ते सौ. **मनिषा पोतदार** यांच्या **विश्वास** या ध्येयवादी कवितेने

आले अंधारून आता जरी किती चोहीकडे
माझा विश्वास सांगतो आता जायचेच पुढे ...

इप्सीत साध्य होण्यासाठी अविश्रांत परिश्रमाची गरज असते. परंतू नवोदितांनी प्रस्थापित होण्याचा 'पण' करण्यापेक्षा नामवंत होण्याचा वसा घ्यावा. कविता लेखन करणें हे असिधाराव्रत आहे. आकाशात चमचमणारी विद्युलता मुठीत पकडणे म्हणजे कविता होय.

'वज्रादपि कठोराणि' मृदुनि कुसुमादपि असे तिचें स्वरूप आहे.

कवी **पंडित पी. धामणकर** आपल्या **आव्हान** मध्ये सांगतात

निजबाणांची करूनी लेखणी । काव्य लिहारे अरि रक्तांनी

वणवा आणि फुलांचा सडा एकाच वेळी उरात बाळगणारा कवी असतो कवीवर्य मनमोहन यानी एके ठिकाणी म्हटले आहे.

"शव कवीचे जाळू नका हो । जन्मभरी तो जळतची होता
फुले तयावरी माळू नका हो । जन्मभरी तो फुलतची होता ...

कविमध्ये नम्रता व बाणेदारपणा असावा. विनयशीलता व अस्मिता हे कवीकुळीचे गुण आहेत, अहंमान्यता आणि आत्मप्रौढी हा आपला वारसा नाही

या देशात सर्व महागडे आहे । पण मरण फार स्वत आहे.

असे परखडपणे सांगायला उरणचे श्री. **ए. डी. पाटील** आणि तुम्ही खुशाल आमच्या इच्छांचा अव्हेर करा । काळीज तोडताना सांभाळून जरा ।। अशी धमकी द्यायला प्रा. **एल. बी. पाटील** मागे पुढे पहात नाहीत.

कवी आत्मसंतुष्ट असू नये. आपली कविता सशक्त असेल, समर्थ असेल तर त्याचा जोरदार प्रवाह अडविण्याची शक्ती कशातच नाही ! प्रसिद्धी माध्यमाची उपलब्धता आणि अनुकुलता यांची फिकीर करू नये. ज्यांच्या कवितेत सामर्थ्य होते त्यांचा शोध घेत प्रसिद्धी माध्यमेंच त्यांच्याकडे गेली ही वस्तुस्थिती आहे.

श्री. आचार्य माधव पोतदार, प्रा. राम बिवलकर, म. ना. पाटील रमेश तेंडुलकर, प्रा. मधुकर पाटील, शरद कोरडे, प्रा. म. सु. पाटील, अजित बिर्जे, रमेश पाटील सौ. भारती मेहता, सौ. निर्मला गोखले, शशिकला मेहता, पी. धामणकर, ए. के. शेख, आय. बी. मित्रे, प्रा. शंकर सखाराम, भगवान निळे अरुण म्हात्रे आदि साहित्यीक रायगड मधील आहेत. अनेक नव्या दमाचे साहित्यीक जोमाने आणि उत्साहाने साहित्य क्षेत्रांत पदार्पण करीत आहेत.

ऐकून होते मला माहित सर्वांचीच होते माती
मग माझ्या माणसांची नक्की माती कुठली असावी? **अलका कांबळे**

सकल देवदेवतांनो ! आपल्या अंगावरील
थोडे - थोडे मांस काढून माझ्या लहानश्या ओंजळीत द्या ! – **अभय पेर**

आदर्श निष्ठा तत्वे विसरा । व्यर्थ क्षीण हा नको मनाला – **देवदत्त साने**

मंगळसुत्र ही अमंगळ, लाचारी करणारे । मुखवटे पांघरत – **गिरीधर पिंगळे**

या सारखे नवोदित कवी जेव्हा जीवनातील कटूसत्य बिनदिक्कतपणे मांडतात त्याचवेळी संजय गुंजाळ, महादेव म्हात्रे, चिपळूणकर गुरुजी हे कवी जीवनाचे ध्येय सांगून जातात किरण बाथम, संतोष गोडबोले शशांक पाटील शां. म. सोनार, सुनिता भागवत, प्रकाश वाडकर, सौ. अख्तर बानू, उदय मोरे, रमेश मोरे, मुरारी बिरवाडकर, अजित बिर्जे, हरीश्चंद्र महाडीक आदिंच्या भावकविता मनाला स्पर्शून जातात, नितीनकुमार राऊत अशोककुमार म्हात्रे, अनंत भोईर यांच्या कवितेत सामाजिक आशय प्रतिबिंबीत झाला असून

निसर्ग असतो मानवा साठी । मानव असतो निसर्गा साठी – कु **पूर्वा जगताप**

हिच्या कवितेतील प्रगती विचार करायला लावते, रायगड मधील व बाहेरील इतर अनेक कवींच्या कविता छान आहेत. तरीही सर्व नवोदितांना एक सांगावेसे वाटते की प्रस्थापितांची मळलेली वाट नवोदितांना अनेकदा मोहवते, चकवते. इथेच नवोदित कवी चुकतात. तेचतेच विषय आधार भुत ठरवून रचना केल्या जातात. छंदोबद्ध रचना करणे हे तसे कठीण काम झाले आहे. मुक्त छंद हा सुद्धा छंदच आहे याचे भान नवकविनां खचीतच असते. तेव्हा लिहायचेच तर मग स्वतःची पायवाट असावी. गझल हा प्रकार लोकप्रिय होत आहे हे पाहुन चक्क गझलांचा भटार खाना करणे हे अज्ञान मुलक ठरेल. महादेव म्हात्रेंची 'वंचना' ही गझल मात्र मनाला समाधान देते. जोशी कमलाग्रजांमध्ये गोविंदाग्रज डोकावतात. कविता आपलीच असणे, आपल्याच पाऊलखुणा जपणारी असणें हे महत्वाचे आहे. कविता ही होते ! ती 'लिहिली' किंवा 'केली' जात नाही हे ध्यानात ठेवण्याची गरज आहे. झाडावर फुल येते, मातीतून अंकूर फुटतो, झऱ्यातून पाणी पाझरते, समुद्राला भरती येते, मातेला मुल होते, त्याचप्रमाणे कवितेचा जन्म होतो. म्हणूनच

काळीज लेखणीचे कुणी कोरु नये । नाराज अक्षरांचे गाणे करू नये

हा मुलमंत्र ध्यानात ठेवावा. कवितेचे देणें हें प्रतिभेचे लेणें आहे याची जाणीव सदैव अंतरंगात असावी !

कलासागरच्या काव्यमय हृद्‌गतामध्ये डुंबायला आपण विश्वासाने सुरूवात करतो आणि सुखदुःखांचे अनेक हेलकावे घेत, बरंच काही मनात साठवींत भालचंद्र वर्तकांचा किनारा गाठतो तेव्हा मन तृप्त झालेंले असते !

सकल कविंना आणि कलासागरच्या स्तुत्य उपक्रमास शुभेच्छा !

**परेन जांभळे**

# अ नु क्र म णि का


| | | |
|---|---|---|
| सौ. मनिषा पोतदार | विश्वास | १ |
| ,, ,, | क्षण | २ |
| शशांक पाटील | अवाज... | ३ |
| ,, ,, | क्षणाक्षणाचे ... | ४ |
| पंडित धामणकर | आव्हान | ५ |
| ,, ,, | दीप | ५ |
| शां. म. सोनार | प्रीत | ६ |
| ,, ,, | पाऊस | ६ |
| सौ. सुनिता भागवत | सहजीवी | ७ |
| हरिश्चंद्र महाडिक | पाऊस ... | ८ |
| सौ. दिप्ती दांडेकर | मला असे | ९ |
| अनंत भोईर | जलद ट्रेन | १० |
| उदय मोरे | किनारा | ११ |
| संतोष गोडबोले | तरंग | १२ |
| देवदत्त साने | कालमहिमा | १३ |
| महादेव म्हात्रे | वंचना | १४ |
| ,, ,, | संध्या छाया | १४ |
| गिरीधर पिंगळे | जीवनाचीभीक | १५ |
| ,, ,, | रात्रीची स्वप्ने | १६ |
| अशोक म्हात्रे | संधी साधू | १७ |
| ,, ,, | अशीअसावी ... | १८ |
| जनार्दन भोईर | माणगांव ... | १९ |
| सौ. शिला बेडेकर | मन | २० |
| ,, ,, | जाई जुई | २० |
| वसंत पालकर | तुझ्या स्वागता | २१ |
| गणेश शेलार | शपथ घेऊ या | २२ |
| ,, ,, | सकाळ | २२ |
| वसंत पालकर | सुंदर कोकण | २३ |
| किरण बाथम | गुणाकार | २३ |
| चिपळूणकर गुरूजी | कृतार्थ ... | २४ |
| ए. डी. पाटील | मरण स्वस्त ... | २५ |
| मधुकर जोशी | मातृहृदय | २६ |
| ,, ,, | बालमन | २७ |
| प्रकाश वाडकर | प्रतिक्षा | २८ |
| ,, ,, | निराश | २९ |
| नितीन राऊत | मनातील शल्य | ३० |
| सौ. अख्तरबानू | कहाणी ... | ३१ |
| ,, ,, | किनाऱ्यावर | ३१ |
| सि. एस. धोपटे | सांज | ३२ |
| विश्वनाथ घाडगे | भालगांव | ३२ |
| प्रा. एल. बी. पाटील | काळीज ... | ३३ |
| संजय गुंजाळ | जीवन | ३४ |
| रमेश मोरे | दर्शन | ३४ |
| ,, ,, | ना बहर मी | ३५ |
| अलका कांबळे | पूर्वजांची माती | ३६ |
| पूर्वा जगताप | प्रगती | ३७ |
| अभय पैर | महामंत्रासाठी | ३८ |
| मधुकर सवाखंडे | थांब जरासा | ३९ |
| मुरारी विरवाडकर | तृषार्त मी | ४० |
| ,, ,, | हरवलेले सूर | ४१ |
| कमलाकर घरत | अन्नदाता | ४२ |
| मनोहर ठाकूर | एकरात्र | ४३ |
| अजित बिर्जे | ओळख | ४४ |
| भालचंद्र वर्तक | किनारा | ४४ |

# ❀ विश्वास ❀

किती होता अवघड
उभा घाट तो ठाकलेला
आज ओलांडून आलें
खरे वाटते ना मला......

होत्या काटेरीच वाटा
किती पाय रक्ताळले
स्वप्न त्याच वाटेवर
किती किती ठेचाळलें......

होती अंधारी सोबत
कशी मला एकटीला
तेंव्हा दिशाही कोणती
उमजे ना पापणीला......

होते सारे दगाळले
पाय होते जडावले
तरी चालायचे आहे
किती मना बजावले......

आता घाट माथ्यावर
उभी राहून पाहते
पुढे उभ्या क्षितीजाला
कशीपण वेडावते......

कुणी म्हणावे जिंकले
जिद्द झाली हो पुरती
मला मात्र एकवाटे
आली हातात पणती......

आले अंधारून आता
जरी किती चोहीकडे
माझा विश्वास सांगतो
आता जायचेच पुढे......

**सौ. मनिषा माधव पोतदार**

कार्यकारी संपादक भूषणराज पेण, रायगड

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२९९८ दा. क्र. २६२७५ काव्य २५/१२/८०

# क्षण

कुणी सांगितले माग हवे ते
मिळेल तुजला सहजपणाने
मागायाची मी न कधीही
चंद्र गगनीचा तसे चांदणे......

मागायाची मी न कधीही
गगनभेदी ती पर्वत उंची
किंवा वर्षावाने न्हाऊन
निघते पृथ्वी सुंदर साची......

मागायाची मी न कधीही
इंद्रधनूची कमान सुंदर
स्वर्ग हासतो ज्याच्यामध्ये
लवून बघते मोहक अंबर.... ..

मागायाची मी न कधीही
त्या ओढयाची अवखळ खळखळ
किंवा अपुल्या अथांगतेने
भिती घालि जो सागर केवळ......

फक्त मला ते हवे एकले
गोजिरवाण्या त्या बाळांचे
बोल बोबडे चिमण्याओठीं
अगणित क्षण ते सहवासाचे .....

सौ. **मनिषा माधव पोतदार**
कार्यकारी संपादक भूषणराज पेण, रायगड

# * आवाज ओळखीचा *

आवाज ओळखीचा यावा दुरुन कानी
हुरहुर अंतरीची डोळयांत दाटताना......

हे दिप मालवून जावे कुणीतरी
अन् चषक चांदण्याचे प्यावे कुणीतरी
रुतलीत काळजावर ती धुंदकुंद गाणी
आवाज ओळखीचा ......

वाळूत कोरलेली तू सांज मखमली
गेले खुडून मीपण जणू एक पाकळी
पाण्यात सागराच्या स्वर पेरलेत कोणी
आवाज ओळखीचा......

जेथे युगेयुगेही निमिषार्ध थांबली
तेथेच अंबरानेही कात टाकली
होणे कधीच नाही हितगूज त्या ठिकाणी
आवाज ओळखीचा......

श्री. **शशांक ना. पाटील**
श्रीबाग क्षेत्र क्र. २
प्लॉट नं. ई/३९
श्रीबाग - अलिबाग



# क्षण

कुणी सांगितले माग हवे ते
मिळेल तुजला सहजपणाने
मागायाची मी न कधीही
चंद्र गगनीचा तसे चांदणे......

मागायाची मी न कधीही
गगनभेदी ती पर्वत उंची
किंवा वर्षावानें न्हाऊन
निघते पृथ्वी सुंदर साची.......

मागायाची मी न कधीही
इंद्रधनूची कमान सुंदर
स्वर्ग हासतो ज्याच्यामध्ये
लवून बघते मोहक अंबर.... ..

मागायाची मी न कधीही
त्या ओढ्याची अवखळ खळखळ
किंवा अपुल्या अथांगतेने
भिंती घालि जो सागर केवळ.......

फक्त मला ते हवे एकले
गोजिरवाण्या त्या बाळांचे
बोल बोबडे चिमण्याओठीं
अगणित क्षण ते सहवासाचे .....

सौ. **मनिषा माधव पोतदार**
कार्यकारी संपादक भूषणराज पेण, रायगड

# * आवाज ओळखीचा *

आवाज ओळखीचा यावा दुरुन कानी
हुरहुर अंतरीची डोळयांत दाटताना......

हे दिप मालवून जावे कुणीतरी
अन् चषक चांदण्याचे प्यावे कुणीतरी
रुतलीत काळजावर ती धुंदकुंद गाणी
आवाज ओळखीचा ......

वाळूत कोरलेली तू सांज मखमली
गेले खुडून मीपण जणू एक पाकळी
पाण्यात सागराच्या स्वर पेरलेत कोणी
आवाज ओळखीचा......

जेथे युगेयुगेही निमिषार्ध थांबली
तेथेच अंबरानेही कात टाकली
होणे कधीच नाही हितगूज त्या ठिकाणी
आवाज ओळखीचा......

**श्री. शशांक ना. पाटील**
श्रीबाग क्षेत्र क्र. २
प्लॉट नं. ई/३९
श्रीबाग - अलिबाग



# ❀ क्षणाक्षणाचे गहिवरणे ❀

क्षणाक्षणाच्या गहिवरण्याने
तुझे न माझे समुद्र झाले
काळाच्याही खांद्यावरती
मुकेपणाचे ओझे झाले......

असे नसावे कधी रितेपण
रितेपणाला यावी भरती
निःश्वासांची तरी असावी
सजीव वर्दळ अवतीभवती......

अशा नसाव्या विरह वेदना
जसा फुलांना दंश विजेचा
तृण पात्यांवर थरथरणारा
जीव होई हा थेंब दवाचा......

कुणी नसावे अवतीभवती
फक्त सुखाचे रान झुलावे
आणिक मंजुळ वाऱ्यावरती
हुरहूरणे तव मिरवत यावे......

तहानलेपण असे असावे
पाण्याविण जे शमून जावे
समुद्र तीरावरती आपण
क्षणाक्षणाला गहिवर व्हावे... ..

**शशांक ना. पाटील**
अलिबाग.

## ❁ आव्हान ❁

एका एकी वीज चमकली वादळ हे घनदाट
आडवा आक्रमणाची लाट

निज बाणांची करून लेखणी
काव्य लिहा रे अरि रक्तांनी
अमर गीत गातील, उद्यांचे दिशादिशांतून भाट ।। १ ।।

स्वप्नीलतेला जाग येऊ द्या
अभिमानाची आग उसळू द्या
अपमानाची चीड दावू द्या, तुम्हा क्रांतीची वाट ।। २ ।।

पुरे शांतिच्या वाटाघाटी
पुरे प्रीतीची आता कसोटी
निज शौर्याने बदलून देण्या इतिहासाची घाट ।। ३ ।।

निश्वासांनी दिशा कोंदल्या
इतिहासही रक्तात रंगला
विजयश्री वरमाला घेऊन उभी सिध्द दारात ।। ४ ।।

## दीप

हे दीपका,
निर्सग निर्मित निशासमयीं,
जगताला जीवन किरणांचे दान तू करतोस
आणि आपला जीवन दीप
झुरवतोस त्याच कामी इतका......
कीं, शेवटी झुरुन - झुरून संपून जातोस
काळोख्या काजळचा रात्रीं
प्रवाशांच्या भीतिचें निर्मूलन करणाऱ्या हे दिपा
धन्य आहे तुझी !
धन्य तुझ्या त्यागाची
मित्रा अगाध तुझ्या स्मरणाची !

**कवि :- पंडित पी. धामणकर**

धामणकर निवास रामवाडी, पेण

## ❀ प्रीत ❀

ओठ तुझे गं
शब्द माझे
बाहेर पडले गीत
नांव तयाचे प्रीत......

नयनी तुझ्या गं
अश्रू माझे
गाली उमटले स्मित
नांव तयाचे प्रीत......

घाव रितीचा
ढाल प्रीतीची
पदरी पडली जीत
नांव तयाचे प्रीत......

## * पाऊस *

मला नकोय तुझ्या
नयनांचा मुसळधार पाऊस
प्रितीचा बांध फोडणारा !

हवा आहे
एक थेंब
स्नेहल स्वातीचा
माझ्या वाळवंटी शिपल्यात
मोती देणारा !

श्री. **शां. म. सोनार**
के. व्ही. हायस्कुल, जामगांव
सुतारवाडी, पो. जामगांव, ता. रोहा
जि. रायगड, पिन ४०२ ३०४

# सहजीवी

उदंड आहे उत्साह तुमचा
उदंड आहे हौस तुमची
जीवन याच मापान तोला
हीच आहे इच्छा माझी

राहो अशीच एकवाक्यता
द्वैत भावना नको मनी
आपणाहुनी ना दुसरा उणा
हीच कल्पना करा मनी

दास असे कुणी सरस्वतीचा
लक्ष्मी असे कुणाची दासी
नका मानू लहान मोठा
सारी लेकरे ईश्वराची

कुणी भावाचा असे भुकेला
कुणी असे मानभावी
परी सांगते एका होरा
व्यक्ति तितक्या असती प्रकृति

मन आपुले मोठे करा
विकल्प भावना दूर सारुनी
हाची असे मंत्र सुखाचा
आपण सारे सहजीवन यात्री

**कवयत्रि सौ. सुनिता वि. भागवत**
ता. माणगांव, जि. रायगड



## ❀ पाऊस देतो साथ ❀

निल नभातूनी सर सर झरती
मोती जल बिंदूचे
धरती वरल्या वृक्ष लतांना
साज आगळा चढे ।

शीळ घालूनि फिरतो वारा
खुशाल चेंडू परी
उधळूनि देतो जल बिंदूच्या
पानावरल्या सरी ।

वनसराईच्या हरित मंडपी
मोर नाचतो थुई थुई
नील नभांगणी इंद्रधनुष्य
कमान शोभा देई ।

निर्झर गाती गीत वर्षाचे
हिरव्या कुरणांतूनी
पाण्यामधली चिंब लव्हाळी
आनंदाने डूलती ।

शेतामधुनी नांगर फिरती
श्रमती साकर हात
स्वप्न उद्यांचे फुलवायाला
पाऊस देतो साथ ।

श्री **हरिश्चंद्र महाडीक**
मु. सुतारवाडी पो. जामगांव
ता. रोहा, रायगड.



# ❀ मला असे वाटते ❀

क्षितिजावरले नयनरम्य इंद्रधनुष्य पाहून
   मला असे वाटते,
आपलेही जीवन असेच खुलावे
   विविधांगाने, विविध रंगाने ॥

बागेमधल्या सुवासिक फुलांचा गंध पाहून
   मला असे वाटते,'
आपलेही जीवन असेच दरवळावे
   विविधस्मृतीने, विविध वासाने ॥

सुसाट वारा भन्नाट वाहतांना पाहून
   मला असे वाटते,
आपलेही जीवन असेच झळझळावे
   विविधसुरांनी विविध वलयांनी ॥

तेजाळलेला मध्यान्हीचा सूर्य माथी पाहून
   मला असे वाटते,
आपलेही जीवन असेच तळपावे
   विविध रूपाने विविध तेजाने ॥

पण हेतर मनीच्या स्वप्नांचे झाले खेळ
   उरले फक्त जीवनांत शून्य गोल.

श्रीमती. **दिप्ती विभाकर दांडेकर**
मुरूड नगरपालिका, शिक्षण मंडळ



# " जलद ट्रेन "

थांबण्याचं जीला नाही स्टेशन –
दाऊनी सिग्नल लाल त्रिकोण ।
थांबविल कोण ही आमची –
विचारी आंधळी जलद ट्रेन ॥धृ॥

लोकसंख्या वाढविण्याची आम्ही घेतलेय हमी
पण अपघात रेल्वेचा आम्हा लावितो कामी
हक्क आमुचा तो आहे जन्मसिद्ध
कर्तव्य आमुचं ते पार पाडणं ॥१॥

पडत्या घरांचे टेकू काढणारे
भारतभूमीची आम्ही लाडकी लेकूरे
कर्तव्यतत्पर आम्ही गवंडी - सुतार
उभे करू आम्ही आधारस्तंभ नविन ॥२॥

जल बनलाय राजा दोन तृतीअंश भागाचा
मग का सोडावा हक्क आम्ही आमुचा
दुर्मिळ झालं जरी आम्हा अन्न धान्य
ठेवु आम्ही अशीचं लाईन लावून ॥३॥

देशाच्याच प्रगतीसाठी करू आम्ही धडपड
साऱ्यांना बनवू आम्ही शास्त्रज्ञ - डॉक्टर
कुणी ना मरावं, काही कमी ना पडावं
ठेवू आम्ही आमुचा देश समृद्ध बनवून ॥४॥

**श्री. अनंत धर्मा भोईर** ( नाटककार )
डी. बि. पाटील चाळ, आसदे गांव,
डोंबिवली (पूर्व), ता. कल्याण, जि. ठाणे.



# किनारा

दोन किनारी आपण दोघे होतो अन ओळखी ।
परी सरितेने या जाणिले आपुले भाव सखी ।

दोन आपुली मने होती दोन किनाऱ्यासम ।
परी सरितेने जाणिले बघ उभयतांचे मर्म ॥
ही सरिता जणू साक्षीदार ती आपुल्या प्रेमाची ।
कारण तिजला माहीत आहे प्रिती सागराची ॥

तुझ्यातला आवडे अवखळ भाव या सरितेशी ।
म्हणोनी झाली तुझी सखी ती माहीत ना तुझसी ॥
होता मिलन प्रिय आपुले या किनाऱ्यावरी ।
सरिता होती हळूच हसत त्या किनाऱ्यावरी ॥

प्रित आपली फुलली आहे या किनाऱ्यावरी ।
उपकार झाले या सरितेचे जन्मजन्मांतरी ॥
विसरू नको तू कधीच प्रेमळ या किनाऱ्याला ।
सदैव होईल उपकारक हा भावी जीवनाला ॥

कवी – **उदय दत्तात्रेय मोरे**
डॉ. सी. डी. देशमुख कॉमर्स कॉलेज रोहा
मु. पो. मेढा, ता. रोहा, रायगड



# " जलद ट्रेन "

थांवण्याचं जीला नाही स्टेशन –
दाऊनी सिग्नल लाल त्रिकोण ।
थांबविल कोण ही आमची –
विचारी आंधळी जलद ट्रेन ॥धृ॥

लोकसंख्या वाढविण्याची आम्ही घेतलेय हमी
पण अपघात रेल्वेचा आम्हा लावितो कामी
हक्क आमुचा तो आहे जन्मसिद्ध
कर्तव्य आमुचं ते पार पाडणं ॥१॥

पडत्या घरांचे टेकू काढणारे
भारतभूमीची आम्ही लाडकी लेकूरे
कर्तव्यतत्पर आम्ही गवंडी - सुतार
उभे करू आम्ही आधारस्तंभ नविन ॥२॥

जल बनलाय राजा दोन तृतीअंश भागाचा
मग का सोडावा हक्क आम्ही आमुचा
दुर्मिळ झालं जरी आम्हा अन्न धान्य
ठेवु आम्ही अशीचं लाईन लावून ॥३॥

देशाच्याच प्रगतीसाठी करू आम्ही धडपड
सान्यांना बनवू आम्ही शास्त्रज्ञ - डॉक्टर
कुणी ना मरावं, काही कमी ना पडावं
ठेवू आम्ही आमुचा देश समृद्ध बनवून ॥४॥

श्री. **अनंत धर्मा भोईर** ( नाटककार )
डी. बि. पाटील चाळ, आरादे गांव,
डोंबिवली (पूर्व), ता. कल्याण, जि. ठाणे.



# किनारा

दोन किनारी आपण दोघे होतो अन ओळखी ।
परी सरितेने या जाणिले आपुले भाव सखी ।

दोन आपुली मने होती दोन किनाऱ्यासम ।
परी सरितेने जाणिले बघ उभयतांचे मर्म ॥
ही सरिता जणू साक्षीदार ती आपुल्या प्रेमाची ।
कारण तिजला माहीत आहे प्रिती सागराची ॥

तुझ्यातला आवडे अवखळ भाव या सरितेशी ।
म्हणोनी झाली तुझी सखी ती माहीत ना तुझसी ॥
होता मिलन प्रिय आपुले या किनाऱ्यावरी ।
सरिता होती हळूच हसत त्या किनाऱ्यावरी ॥

प्रित आपली फुलली आहे या किनाऱ्यावरी ।
उपकार झाले या सरितेचे जन्मजन्मांतरी ॥
विसरू नको तू कधीच प्रेमळ या किनाऱ्याला ।
सदैव होईल उपकारक हा भावी जीवनाला ॥

कवी – **उदय दत्तात्रेय मोरे**
डॉ. सी. डी. देशमुख कॉमर्स कॉलेज रोहा
मु. पो. मेढा, ता. रोहा, रायगड



## ★ तरंग ★

आकाशाच्या नीलांगणी
कल्पतरू बहरला
वेलमंडप फुलला
चांदण्याने मोहरला ॥

ठाई ठाई दृष्टी पडे
कळ्या जाईच्या फुलल्या
गंध गंधाने भूलला
दर्या लाटेनं बोलला ॥

लाख ज्योती डोळयामध्ये
माझ्या आशेनं फुलल्या
झुळू झुळू वाऱ्यासंगे
झाप झावळया डोलल्या ॥

मान उंचावून नभी
चंद्र आणिक खुलला
गूढ माझ्या अंतरिचे
कानी तुझ्याही बोलला ॥

गीततरंग मनाशी
हळूवार तरंगला
लाट लाटेशी खेळता
स्वर ओठाशी थांबला !

श्री. **संतोष गोडबोले**
बँक ऑफ इंडिया
जंजिरा-मुरुड, रायगड

# कालमहीमा

क्षणभंगुर हे जीवन आपुले
पैसा खेचा क्षणाक्षणाला
आदर्श, निष्ठा, तत्वे विसरा,
व्यर्थ क्षीण हा नको मनाला ॥

संधी साधा, तोरण बांधा
लक्ष्मी आणा आपल्या दारी
लज्जा सोडून उभेच ठाका
जरी कुणी का म्हणो भिकारी ॥

स्नेहभाव तो नका आठवू
विसरून जा हो नातीगोती
विश्वासाने मनास सांगा
आता धाव पैशाच्या पाठी ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२६९५
ग्रं. क्र. २५२७६
कांव्य २५/४/९०
ग्रंथ शाखा

लक्ष्मी जर का प्रसन्न झाली
जीवन सारे जाईल बदलून
आप्तस्वकीय भवती जमतील
दोषांवर घालूनी पांघरूण ॥

टोपीवाले, फेटेवाले
येतील रोज तुमच्या दारी
योग कधीतरी उत्तम येईल
बनाल झटकन थोर पुढारी ॥

पायावरती घेईल लोळण
सत्ता आणि गरीब जनता
मानमरातब देऊन म्हणतील
ह्या युगातला आपला त्राता ॥

लाखो कमवुनी शंभर रूपडे
जनतेला द्या भीक म्हणूनी
नाव झळकवा मंदिरामध्ये
हजार नोटा दान करुनी ॥

असा तऱ्हेने जीवन ...
पैशासोबत मिळेल कीर्ति
नव्या युगाची पहाट होई
पावन होईल सारी धरती
—x

**देवदत्त दा. साने ॥ सुबोध ॥**
एम. डी. ४२ एच. २/२ सिडको, नांदेड

# ❀ वंचना ❀

वाट ती विसरलेली, आता पुन्हा दिसणार आहे
त्या जुन्या आठवणीने, मी आता झुरणार आहें।

सारेच परके झाले इथे, स्नेह बंधन संपले
साथ घेऊन हा दुरावा, मी असा जगणार आहे।

तो स्तंभ होता यार माझा, हिणवितो वाटे मला
स्पंदने घेऊन उरी, मी आता फिरणार आहे. ।

पाकळीही आता फुलाची, टोचते काटयापरी
वेदनांचा भार घेऊन, मी असा शिणणार आहें।

पोळलेल्या या मनास, तू ही जख्मी केलेस ना।
वाळवंटी जीवनात, मी आता झिजणार आहे।

# *- संध्या छाया -*

झाला उशीर आता, ऋतुही सरून गेले
ते बंध रेशमाचे, सारे सुटून गेले !

झाला शांत दरिया, नाहीत सुसाट वारे
मध्यान्ह तेज सारे, केव्हाच टळून गेले।

पांघरून संध्याछाया, धूसरली उगवती
तारूण्य मैफलीचे, आता सरून गेले।

झाली उदास पर्णे, पाहून येत शिशीरा
संकेत ही उदासी, जागे करून गेले।

पाहू नकोस मागे, या शुष्कमाळरानी
चालून वाट आता, तारे थकूनी गेलें।

**श्री. महादेव रामचंद्र म्हात्रे**
नागाव, ता. अलिबाग, रायगड

## जीवनाची भीक

अजून मी जीवंत आहे
पैशाने खरीदलेली
ढोरांचे जीवन जगत ।

मर्जी विनाच वाढवत
डुकरांची पिलावळ
गंडे दोरे अन् भगत ।

कपाळावरील मळवट
भेसूर गुलाल
बसले नरकात पिचत ।

मंगळसूत्रही अमंगळ
लाचारी करणारे
मुखवटे पांघरत ।

सौभाग्यही अभागी
लूत भरलेले श्वान
उकीरडे हुंगत ।

जीवनाची राख
राखेतील जीवन
जीवनाची भीक मागत ।

श्री. **गिरीधर का. पिंगळे**
मुख्याध्यापक रा. जि. प. से. स्कुल
मु. बोरघर हवेली, ता. माणगांव

# * रात्रीची स्वप्ने *

रात्रीची स्वप्ने आली
काळोखाचे पंख लावून
दिवसाच्या लाल चक्षूना
घावरवण्या साठी...........

अन् दिवसाला जाग आली
चराचराने डोळे उघडले
धावू लागली स्वैरावैरा
मोर्चागत धावत सुटलेले......

नेत्याला मागे टाकून
नग सैनिकांची कोंडी फोडीत
उडताहेत चिळकांड्या
लाले लाल...........

पेरलेले सुरूंग उडवित
विदीर्ण होवून
फाकलेली किरणे
झालेत जलद लालेलाल......

अंवरातील काळाकुट्ट अंधार
झालाय निराधार
पंख शोधित फिरतोय
पहातोय मिळतो का आधार......

**श्री. गिरीधर का. पिंगळे**

मुख्याध्यापक रा. जि. प. से स्कुल
मु बोरघर हवेली ता. माणगाव

# संधी साधू

जेथे चिरीमिरी मिळे
गुळा चिकटती डोंगळे,
संधीसाधू ते ओळखावे
स्वार्थी हिरे ते जाणावे.

भक्ष टिपण्या बक ध्यानस्थ
तैसे लोभीयांचे चित्त,
जे देती लाच काही
त्यांसी धरिती हे हृदयी.

दंग लुटण्या जे लोकांसी
करिती बेईमानी देशासी,
किर्तने वरूनी हे करीती
अंतरी तमाशांची ख्याती.

नित्य छळीती बांधवांसी
तैसे जनता - जनार्दनाशी,
अशोक म्हणे वर्णू किती
अशा कसायांच्या मूर्ती.

**अशोक कुमार पांडुरंग म्हात्रे**
साहित्य विशारद
(दमखाडी) रोहा

# * अशी असावी संघटना *

अरे एक है हम सब
अशी मारती फक्त बोंब,
मात्र कार्याकार्यालयात
उसळताहेत असंतोषाचे डोंब.

केवळ बोलाचाच भात
आणिक बोलाचीच कढी,
फक्त मतलबासाठी जो तो
करीत असतो कुरघोडी.

बांधवांसी सदैव छळीती
नसते यांना कसली नीती,
दंग ओढण्या सदैव असती
तूप आपुल्याच पोळीवरती.

कुटील कारस्थाने रचणे
हाच यांचा न्याय खासा,
संघशक्तिच्या नावाने
वडा घर पोकळ वासा.

असे मुँहमे रामनाम
अन् बगलमें छुरी,
लाळ घोटण्यांतच यांची
जाते जिंदगी हो सारी.

जाणून घेता बळ एकीचे
होईल कल्याणच सर्वांचे,
हात सरसावेत सहकार्याचे
विसरून सारेच भेद मनांचे.

अशी असावी संघटना
जोडील जी मना - मना,
अन्याय कुणावरही घडेना
सर्वा मनी व्हावी वेदना.

**अशोककुमार पांडूरंग म्हात्रे**
साहित्य विशारद. (दमखाडी) रोहा.

# माणगांव आमुचे गांव

रायगडाच्या पश्चिम अंगे,
मुंबई-गोवा मार्गा संगे,
काळ नदी खळाळून सांगे
माणगांव आमुचे गांव ॥ धृ ॥

मुळशी धरणाचे विपूल पाणी,
कालव्यातूनी त्यास वळवूनी,
डोंगर दरीच्या परिसरातूनी
सुपीकता घे धाव ॥ १ ॥

इथ शिवबाच्या शौर्याचे । तेज उमगले, तेज
ह्या कणाकणातून जन्म । घेती मावळे, वीर
त्या कचेरीपुढे स्मारक ते । शोभले, परमवीर भले
" व्हिक्टोरीया क्रॉस " विजेते । परमवीर
घाडगे यशवंतराव ॥ २ ॥

आम्हीकिती जात पंथीय । इथे राहतो, इथे
एकता बंधु भावाने । सुखे नांदतो, सुखे
सहकार्य परस्परांचे । भले पाहतो, भले
देशाभिमान सदा जागतो -
अन्याया प्रति धाव ॥ ३ ॥

साहित्य कला संगीत मनोरंजना, मनो
प्रयत्न ज्ञान वर्धना रसिकरंजना, रसिक
इथे रसिक मंडळाची, केली स्थापना, केली
आदर्शाचा धडा घातला,
स्फुर्तीचा सद्भाव ॥ ४ ॥
माणगांव आमुचे गांव ॥ धृ ॥

जनार्दन भोईर
माणगांव ( रायगड )

## ❀ मन ❀

या संध्यासमयी मन का कातर होई ?
आकंठ बुडाले असता, आनंदाचे डोही
कधी क्षणभर उगीचच, मन हे शंकित होई
सुख सोहळ्यास या लागे नजर न बाई
जीवनी लाभली प्रभुकृपा पुण्याई
आधार केव्हढा हा ध्यानी न कैसे येई ?
मन द्विधा स्थितीची निसर्ग किमया ही
हे जाणून अंती मन शांत तृप्त मी पाही

## * जाई जुई *

जाई जुईची जोडी माझी निजे पाळण्यांत
अंगाईचे गोड सूर हे विरती आसमंतात
दोन्ही छकुल्या सुखवितात
क्षण एक कधी दुखवितात
कौतुकात या सरुनी जाई
माझा दिन आणि रात ॥ १ ॥
इवल्या चिमण्या उबेत वाढतील
पंख फुटुनिया उडुनी जातील
तोवरी हे रूप तयांचे
साठविन हृदयांत ॥ २ ॥
लालन पालन करता करता
दुनियेचे मग भान न उरता
सदैव इच्छीन मनोमनी मी
प्रभुचे आशीर्वाद ॥ ३ ॥

सौ. शीला ज. बेडेकर
बी ३ शेरीयर फ्लॅटस्, उदय टॉकीज जवळ
घाटकोपर ( प. ) मुंबई ४०००८६

## तुझ्या स्वागता

तुझ्या स्वागता येईल सखये
घन तिमिरातुन मदीर चांदणे
आणि अनामिक आस ! जुळावी
तृषित मने ही उन्मादाने ॥ १ ॥

झरेल मोहक गोड चांदणे
लाल गुलाबी तव गालांवरी
निशिगंधाच्या सुमनांपरि अन्
फुलेल नाजुक भाव अंतरी ॥ २ ॥

अंतरीचे मृदुभाव विकसता
गुलमोहर तो लज्जित होईल
हर्षे मधुमालती अन् मोगर
मुक्तपणे निज सौरभ उधळील ॥ ३ ॥

अगणित गंधा संगे घेऊन
खटचाळ वारा मधेच येईल
नवप्रीतीच्या जलाशयावर
मृदुल मनोहर तरंग उठतील ॥ ४ ॥

प्राजक्ताचा सुगंध शीतल
दोन जिवांना करील धुंद
आणि अचानक सारे तुटतील
अर्थहीन दुनियेचे बंध ॥ ५ ॥

बकुळ सुमांची होईल पखरण
भूषविण्या ग आपुले मीलन
मिटल्या नयनांनी मी पाहीन
मोहरलेला तो गंधित क्षण ॥ ६ ॥

**वसंत पालकर**
बी. ए. (स्पे.) हिन्दी पंडीत
सहशिक्षक ना. म. जोशी विद्याभवन
गोरेगांव (रायगड)

## शपथ घेऊ या

आज शपथ घेऊया । आज शपथ घेऊया
हे निशाण आपुले गगनी उंच नेऊया
जाती भेद सोडूया
सर्व एक होऊया
राष्ट्र पुढे नेऊया
मान ताठ ठेवूया
फुले ध्वजास वाहूया
राष्ट्र गीत गाऊया
आज शपथ घेऊया । आज शपथ घेऊया
हे निशाण आपुले गगनी उंच नेऊया

## सकाळ

सूर्य उगवला प्रकाश पडला
झाली राने हिरवी पिवळी
निळया नभामधे पक्षीगणही
उडती आनंदात सकाळी
वारा गातो गाणी फुलांवर
फुले नाचती हासत डोलत
रविकिरणेही पडता पिवळी
हांसे हिरवा चाफा उमलत
सारी झाडे फुलली सुंदर
आला वारा सृष्टी डोलवित
गाती पक्षीही गाणे मंजुळ
सकाळ येते निसर्ग सुखवित

**गणेश केशव शेलार**
बी/२७, माहीम मुंबई नं. १६



## माझं सुंदर कोकण

माझं सुंदर कोकण जणु सोनियाची खाण
फेडी डोळयाचं पारणं लाल मातीचं कोंदण ।।
गिरी कंदरी चालते नदया ओढयांचें गायन
आसमंती सागराचे घुमे स्वप्नील गुंजन ।।
इथं नारळी पोफळी किती डोलती डौलानं
माळावर वृक्ष वेली बहरल्या ओथंबून ।।
साग वड पिंपळ ऐन जागताती रात्रंदिन
कोकणच्या वैभवाला हात लावील का कोण?
काजू आंबा फणसाची इथं नाही कधी वाण
बोर जांभूळ करवंद भरलेलं सारं रान ।।
केली धरा सुशोभित जाई जुई मोगऱ्यानं
करी बकुळ प्राजक्त सोन्या रुप्याचं शिंपण ।।
माय भूमीच्या चरणी केली सुमने अर्पण
रत्नांसम प्रकाशलं माझं सुंदर कोकण ।।

**वसंत पालकर** गोरेगांव (रायगड)

## × गुणाकार ×

तिचे गुण पाहून
मी गुणाकार करू लागलो, तिच्यावर
माझ्या गुणाकाराला तिनं -
प्रोत्साहन दिल
कित्येक गुणाकार केलें मी
एके दिवशी तिने माझ्या गुणाकारावर -
नाराजी व्यक्त केली
मी संभ्रमीत, एकाकी
मागचे सर्व गुणाकार आठवू लागलो
दुसऱ्याच दिवशी वर्गात शिकलो
शुन्याला कितीही गुणल तरी उत्तर शुन्यच.

श्री. **किरण बाथम** मुरुड-जंजिरा

मराठी ग्रंथ संग्रहालय
२६९०
वा. क्र. २६२७६
काव्य
शाखा

# ॐ कृतार्थ जीवन ॐ

जीवा कुठवरी - तू सांभाळूनी ।
जपून ठेवशील - माझा म्हणुनी ।
मायेचा पगडा - मनावर मायेचा पगडा ॥

जगी मानवा जन्मलास तू
कसला कपडा - पांघरला तू
कुणी पाळिले - कुणी पोशिले
कळले का वेड्या - मनावर ॥ १ ॥

मायबाप अन् सगेसोयरे
बंधू - भगिनी तुझेच सारे
कुठुनी आले - कुठे जायचे
ठाऊक का वेड्या - मनावर ॥ २ ॥

घे संसारी - सर्व सुखांना
करी आनंदे - कालक्रमणा
परी यातुनी - मुक्त व्हावया
सोड सैलसा आठा - मनावर ॥ ३ ॥

देव धर्म अन् कर्मयोग हे
तुझेच सारे - कर्मभोग हे
आनंदाने उपभोगून घे
छातीने निधड्या - मनावर ॥ ४ ॥

घरात राहिल - तुझी सुनिती
जगात होईल - तुझी सुकीर्ती
कृतार्थ होईल - जीवन सारे
यात तुझे रे गड्या - मनावर ॥ ५ ॥

**नारायण चिपळूणकर गुरूजी**
श्री. सिध्दारुढ बिल्डिंग
भवानी शंकर रोड, दादर, मुंबई २८

# मरण स्वस्त झालंय !

आता मरण फार स्वस्त झालय !
मरता येत नाही म्हणून जगायचं
मरणाहून मोठे दु:ख भोगायचं
मरण तर आमच्या वाटयाला दररोजचे !
तुम्हाला ठाऊक आहे ?
पोट जाळण्यासाठी आमच्या कातडया सोलल्यात
नोकरीसाठी नित्याची वणवण
टळला नाही घाम गाळणं
दररोज किती घाम गाळायचा ?
पुसायला वस्त्रे तरी हवीत
शेवटी वाटतं नको ते जीणं
मरण येत तर बरं होत
ह्या देशात सर्व " महागडे " आहे
पण मरण फार स्वस्त आहे ।।
जगणं मात्र कठीण आहे,
जगणाऱ्याने जगाव कसं ?
लेकाचे सुखाने जगू देत नाहीत
वळणा वळणावर किती खाव्या ठोकरा ?
अमर्याद अमाप
पिकतं तेथे विकतं नाही म्हणतात ?
सत्य - कटू सत्य, ते सांगणे मुर्खाचे लक्षण
उंटावरून शेळया हाकणाराना कळणार कसे ?
आमच्या विचारांचा बिनबोभाट " लिलाव " करतात
जगण्यात " राम " नाही
कारण ह्या ना त्या कारणाने आम्ही रोजच मरतो
परंतु, प्रत्येक मरणात जगण्याचे संदर्भ शोधितो एवढेच.

**श्री. अे. डो. पाटील**
अध्यक्ष :- उरण साहित्य संघ,
मु. पो. दिघोडे ता. उरण - रायगड

# मातृहृदय

हे मातृहृदय किती थोर पहा ।। धृ ।।

फुलापरी निजबाळा जपते
निराश छाया कधी न पाडते
हसावया प्रेमाश्रू सिंचते
अन् गोड स्मृतींची पसरी हवा ।। १ ।।

शिशिर दुःख वारे न वहावे
वसंत सुखी निज बाळ नटावे
ध्यास नित्य तन्मनीं म्हणुनि हे
सुकृती बने कोकीळा अहा ।। २ ।।

निज सौख्याची इच्छा नुरते
संतत क्लेषापदा साहते
रात्रंदिन प्रभुपदा वंदते
हो बाळ सुकार्यें थोर महा ।। ३ ।।

विमल प्रेम सरिता जणु वाहे
ध्येय पात्र हे सखोल आहे
भू-स्वर्गांच्या पुण्य प्रवाहें
व्हा बाळ मुदे स्वच्छंद नहा ।। ४ ।।

**(कमलाग्रज)**

**मधुकर यशवंत जोशी**

श्रीवर्धन, जि. रायगड

# बालमन

जाईजुईच्या सुमनापरी ते
पहा बालमन कोमल असते
तगर, मोगरा, प्राजक्ता सम
मोहक सुंदर हसरे दिसते ॥ १ ॥

वकुल फुलापरी कधी कोमजता
सुवास पसरीत राही भवती
नकळत मोहुनी त्याच्या भवती
गुंजारव करी मधुकर वृत्ती ॥ २ ॥

गोड हसे तें बघत रहावे
नकाच नाहक त्या दुखवावे
निर्वाज्या या आनंदाला
कुणि न जीवनी कधी मुकावे ॥ ३ ॥

सरोज सुंदर उमले, दिसते
जीवन हे तर, तडाग साचा
दुःख न त्याला स्पर्श कधीही
अलिप्तता हा भाव सुखाचा ॥ ४ ॥

स्फटिका परी जल झुळझुळ वाहे
रम्य किती तो मधूर जलाशय
बालमना, तुज उपमा अनुपम
तूच जाणसी भाव नि आशय ॥ ५ ॥

(कमलाग्रज)
**मधुकर यशवंत जोशी**
श्रीवर्धन, जि. रायगड

# ❁ प्रतिक्षा ❁

नकोस शिणू तू मौल्यवान डोळे उघडून
नकोस वाट पाहू
कोणी येईल म्हणून..........
स्वप्न नगरीत येईल कोणी
कोमल पाऊलानी..... .........
फुलवीत वसंत मनाचा
नकोस शिणू अणी इच्छा बाळगून

जिथे चंद्र सुद्धा यायला भितो
तेथे चांदण्या कशा येतील ?
नकोस वाट पाहू
चांदण्या येतील म्हणून ..........
त्या कधीच येणार नाहीत
चंद्र नाही म्हणून..............

त्या दाट अंधारात
कोण येणार तुझ्या सोबतीला
कोण बोलणार ? ..........
कोण दिलासा देणार तूला ? ...........
जर अंधारच तुझ्याशी बोलू लागला
तर डोळे उघडे ठेवून
वाट पहा . ........
एखाद्या काळ्या मांजरीची
ती नक्कीच येईल..........

**प्रकाश विष्णू वाडकर (सागर)**
एकदरा, मुरुड - जंजिरा

★ ★ ★
★ ★ ★
★ ★ ★

# * निराश *

आशेवर जगणारा मी
निराशा सोडणारा मी
वाटतयं ...... ! अशाच कोण्या दिवशी
येशीलच तू ........
वसंत बहार घेऊन
मनात फुलबाग फुलवीत .........

अंधाराला हसणारा मी
आज अंधारातच चाचपडतोय
मागे ...... पुढे ...... चारही बाजूने
अंधार घेऊन फिरतोय
एकाच आशेवर
की तू येशीलच .........
एक दीप घेऊन
अंधाराला मागे सारित ......

सतत वाटचाल करणारा मी
आता प्रवासाला कंटाळतोय
वाटतं ...... ! बस झालं
थांबाव इथं .........
तरीही चालतोय .........
वाटतय, भेटशील तू कधीतरी
कुठल्यातरी वळणावर.........
पण

आशेवर जगणारा मी
आता पूर्ण निराश झालोय
निराशा सोडणारा मी
आता निराशेवरच जगतोय

**प्रकाश विष्णू वाडकर ( सागर )**
एकदरा, मुरुड - जंजिरा

# मनातील शल्य

दुःख उराशी हेच बाळगूनी
जरी विज्ञानाची अविरत प्रगती
तरी जे जग अंधःकाराखाली,
निघूया समाज परिवर्तनासी

अत्याचार अन् बलात्कार, हुंडाबळी अन् नरबळी
विषण्ण होई मन, ऐकून बातमी
त्यांना लगाम घालण्यासाठी
निघूया समाज परिवर्तनासी

साथ न घेता. ढोंगी पुढारी
धर्म, जात अन् वंश भिंती
ठोकरून त्या ठिकऱ्या वरुनी
निघूया समाज परिवर्तनासी

अज्ञानाची, अंधःकाराची
तोडून जंगले, नांगरू जमिनी
लागवड करूया नवविचारांची, मानवतेची,
निघूया समाज परिवर्तनासी

कवी – श्री. **नितीनकुमार न. राऊत**
मु. कनकेश्वर फाटा, पो. नवगांव
ता. अलिबाग, जि. रायगड



## कहाणी संपत नाही!

आठवणींची रेशीम जाळी
आपोआपच विणली जाते –
हळू खेचिता धागा कुठला
भुरभुर भुरभुर उसवत जाते
शोध शोधिता परी तियेचे
शेवट दुसरे गवसत नाही
'चिमण्या येती
दाणे नेती'
परि कहाणी संपत नाही!

## किनाऱ्यावर

एक झाकोळलेली रात्र, ... संथ सागर ...
चोरपावली झुळकांची झुळझुळ
आकाशाच्या निळ्या रंगावर
सत्ता गाजवणारा काळोख!
हलकेच ढगाआडून डोकावणारी
एखादी चांदणी........

आणि अशांत –
लाटांवर हिंदकळणारा एक तराफा.........
किनाऱ्यावरील माझं अस्तित्व
विरघळून जात –
त्या तराफ्यावर सुस्त पहुडत –
वहात जात –
एका समुद्रमय धुंदीत, समुद्रमय लयीत
समुद्राचीच एक लाट होऊन
वहात ...... वहात ...... रहात .........

सौ. अख्तरबानू मुख्तार अ. फामे ( नाईक )
शा. अध्यापक विद्यालय, माणगांव

## *** सांज ***

थांबुनी आहे या इथे मी शोधीत कां सांज ती
शिणलेल्या या नयनानी पाहू किती वाट मी ।
स्पर्श होता तुझ्या करांचा शीण सारे जाती दूरी
हरवलेल्या तुझ्या दर्शना शोधू कुठे या सागरी ?

स्वप्न नव्हते भास नव्हता होते खरे हे परन्तु
सोडूनी जाशी अपूर्ण सारे दूर दूर कोठे तरी तू
स्मरेल कां तुला कधी ते वचनानी बांधीलेले
शब्द नव्हते, भाष्य नव्हते भाव होते हृदयातले

विसरुनी जाशील कां अशी तू मनातील स्वप्न माझ्या
कां कुणा प्रेमीकाने बांधील्या त्या खोटया जीव्हा तुझ्या ?
शांत आहे कां, अशांत आहे वाटे तुला असत्य हे
नाही तुला पटणार कधी ते पण सत्य आहे सर्व हे !

सि. एस. धोपटे परेल, मुंबई - ४०००१२

## * सुंदर माझे भालगांव *

स्वातंत्र्य समता बंधुतेची ही नाव
नाही राखले जात येथे भेदभाव
निसर्ग रम्य माझे गांव नाव याचे भालगांव ।।धृ।।

याच्या चारी बाजूनी हिरवेगार डोंगर
डोंगराच्या पायथ्याशी फुटलेंत पाझर
या पाझराचे पाणी लागते सुमधुर
येथील ग्रामवासी असती सुदैवी फार ।। १ ।।

एकी अन् परिश्रमाने या खेडयात
उभारली आहे एक ज्ञानाची ज्योत
मी ज्ञान घेऊनी या खेडयात
राखीन शान याची साऱ्या जगात ।। २ ।।

कवी - विश्वनाथ महादेव घाडगे
मु. पो. भालगांव, ता. रोहा

## ◎ काळीज तोडताना ◎

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२६९७
अ. क्र. २६२५६
काव्य २५/२/९०
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

तुम्ही खुशाल आमच्या इच्छांचा अव्हेर करा
काळीज तोडताना सांभाळून जरा ॥ धृ ॥

राम तुमचा – अल्ला आमचा
येसू त्यांचा – बुध्द कुणाचा ?
हे ठरवताना ...... रक्ताच्या थारोळयातून जाताना
एवढच लक्षात ठेवा .........
साऱ्यांची जन्मदात्री एक वसुंधरा ............ ॥ १ ॥

ताबूत वाजला, गणपती नाचला
शुद्र धेंडानी, दगड फेकला
दंगलीचा स्फोट – जिव्हाळयाचा संबंध तोडताना
एवढच लक्षात ठेवा .........
माणुसकीचा गळा घोटायला सैतान उभा दारा ... ॥ २ ॥

तुमचे पाठिंबे – तुमचे सरकार
तुमची सत्ता – तुमचे अधिकार
सामान्यांच्या व्यवहाराना – राजकारणी तुडविताना
एवढच लक्षात ठेवा
नको प्रेतांचा खच आणि अश्रुधारा ........ ॥ ३ ॥

तुम्ही संन्यस्त – खोटया चेहऱ्यांचे
तुम्ही रक्त पिपासू – दीन दुबळयांचे
तुम्ही रक्षक बनले संहारक आमचे
एवढच लक्षात ठेवा ........
भिक्षुक पडला – फरिश्ता ठेचाळला
भक्त रक्ताळला दरबारा ...... .. ॥ ४ ॥

**प्रा. अेल. बी. पाटील**
उरण ता. साहित्य संघ, उरण - रायगड

## जीवन

जीवन असावं तर अगदी असचं !
घनदाट वृक्षासारखं
स्वतः उन्हात तापुनी
दुसऱ्याला विसावा देणारं
जीवन असावं तर अगदी असचं !
खळाळत्या सरितेसारखं
खाचखळग्यात धावुनी
दुसऱ्याला समृद्ध करणारं
जीवन असावं तर अगदी असचं !
गंभीर सागरासारखं
सुखाच्या लाटा उसळवून
दुःखाचं गुपीत लपविणारं
जीवन असावं तर अगदी असचं !

**संजय पां. गुंजाळ**
जंजिरा - मुरूड, रायगड

## दर्शन

प्रभु तुझ्या दर्शनाने पाप दुःख नासते ।
दैन्य सरे, सौख्य, संपत्ती पुण्य लाभते ।।
घेऊनिया आशेचा किरण उगवशी ।
मावळता तारांकीत दीप लाविशी ।
निर्झर स्वर द्विजख तुझेच हास्य ते ।।
चराचरा कुरवाळीशी पवन कराने ।
सुर्य चंद्र नयन बघती प्रेम भराने ।
फुलाफुलांत दरवळती तुझेच श्वास ते ।
शेते पिकतात तूची करता वर्षावा ।
सर्वांचा वास अंती एक तुझ्या गावा ।
सकलांवर छत्र धरशी निलांबर ते ।।

**रमेश मोरे ( खालगांव )**
अरूणोदय नगर जेरबाई वाडीया रोड मुंबई १२

# ना बहर मी

ना वसंतामधी बहर मी
नयनातले ना स्वप्न मी ।
प्रकाश ना देऊ शके
विझला असे तो दीप मी ॥

स्वप्नी कुणा ना रंग मी
नवतीतला ना संग मी ।
वनवासीचे दुर्दैव मी
झडलीत पाने वृक्ष मी ॥

बहाणा ना निमंत्रणा
कोणा घरी न मी पाहुणा ।
मोजीतसे अंती क्षणा
खचल्या तटाचा दुर्ग मी ॥

सरला जीवाचा सोबती
उजाड वाटे सभोवती ।
काटे जिथे असती अती
वहिवाटीचा ना मार्ग मी ॥

मम रंग रूप न राहिले
दिन संगतीचे संपले ।
वसतीस ना कुणी राहिले
सुने असे घरदार मी ॥

**रमेश मोरे ( खालगांव )**
अरूणोदय नगर,
जेरबाई वाडीया रोड,
परेल मुंबई १२

# पूर्वजांची माती

मातीतून बोटे फिरविता
कांही तरी हाताला लागले
म्हणून उत्सुकतेने शोधले !

मनात अनेक भावना
आल्या होत्या उचंबळून
माझ्याच रक्ता मांसातल्या
पूर्वजांना चाचपडू लागले !

ऐकून होते मला माहीत
सर्वांचीच होते माती !

मग माझ्या माणसांची
नक्की माती कुठली असावी !

माझी नजर भिर भिरली
माझ्या सर्वांगांवर फिरली
ही त्यांचीच माती नव्हे कां ?
पण मी जीवंतच आहे !

माझ्या अंगात त्यांच्याच
शरीरातले रक्त मांस
संक्रमण झाले आहे माझ्यात !

नजर शिवाराकडे वळली माझी
आनंदाने कणसे डोलत होती !
आणि मला म्हणत होती
तुझ्या पूर्वजांची माती
या इथे जीवंत आहे,
त्यांच्याच मातीवर तर
आम्ही जीवन जगतो आहोत.
आणि दुसऱ्यांनाही जगवत आहोत.

**अलका कांबळे**
महाड – रायगड

# प्रगती

अहो, मानवाने केली विज्ञानाची प्रगती ।। धृ ।।
शोधुन काढली खरी संपत्ती
आकाशात पाठवली याने दुप्पती
उदयास नेली सागर संपत्ती
जमिनित घुसवली चक्रे सुपत्ती
सगळीकडे आणली वैज्ञानिक क्रांती ।। १ ।।

निर्सगाला गुलाम बनविण्याच्या प्रयन्तांत
ओढून घेतली स्वत:वरच आपत्ती
जंगले तोडली, खाजणे बुजविली त्यामुळे
दरवर्षी झाली निर्संग कोपाची आवृत्ती
नवीन औषधामुळे मृत्युचीही झाली कपाती
लाईट गेली की शोधावी लागते रॉकेलची बत्ती ।। २ ।।

प्रयोग केले, शोध लावले अन् सिद्ध केली विश्वाची गुप्ती
पण या साऱ्या व्यापात त्याने गमावली आपली मती
तो विसरून गेला आपली नीती
त्यामुळे झाली साऱ्या प्रगतीची माती ।। ३ ।।

निर्संग म्हणे मी ना कुणाचा गुलाम
निर्संग असतो मानवासाठी
मानव असतो निर्संगासाठी
अन् तरीही म्हणे मानवाने........... ।। ४ ।।

कु. **पूर्वा विलास जगताप**
मेहेंदळे हायस्कुल, इ. १० वी रोहा - रायगड



# * 'महामंत्रासाठी' *

हे रामा ! या अल्ला ! बा येशू ! रे बुध्दा !
वो वायगुरू ! आणि समस्त जनतेच्या
सकल देवदेवतांनो ! आपल्या अंगावरील
थोडे-थोडे मांस काढून
माझ्या लहानश्या ओंजळीत द्या !

त्या मांसाच्या गोळ्यापासून मी
एक बाळ बनवेन, छानसे ...
छोटेसे ... गोजिरवाणे !

आपल्याच इच्छाशक्तीच्या जोरावर
त्याच्यात येऊ द्या सजीवत्व ... अमरत्व !
आपण त्याचें नाव ठेवू,
'सर्वधर्मसमभाव' !

चिरंजीवीत्व लाभलेलं बाळ वाढेल ...
त्याची बुध्दी वाढेल ...
विचारही वाढतील ...
तेच दिव्यशिशु देत राहिल महामंत्र,
राष्ट्रीय एकात्मतेचा !
मातृभूमीच्या अखंडत्वासाठी ......

**अभय जनार्दन पैर**
भंडारआळी, बाजारपेठ,
मुरुड - जंजिरा, रायगड.

# - थांब जरासा बाळ -

नाही संपली आमावस्येची रात्र अजूनी बाळा
नको पडू तू आताच बाहेर थांब जरा वेल्हाळा ।। धृ ।।

भयाण काळोख आहे अजूनी वसुंधरे वरती
शोधायला भक्ष आपुले स्वैर पिशाच्चे फिरती
लागताच चाहुल तयाना होतील भोवती गोळा ।। १ ।।

भल्याबुऱ्याची नाही अजूनी ओळख त्याना पटली
मानवतेची नीती मुल्ये जपतील मग ती कुठली
तुडवीत आले पायदळी, तसाच तुडवतील जीव हा भोळा ।। २ ।।

मिणमिणतो हा प्रकाश येथे इवल्याशा या पणतीचा
सुरक्षित ही तुझी झोपडी आधार आहे भिंतीचा
आधीर होऊ नको असा तू लाव जरासा डोळा ।। ३ ।।

भास्कर जेव्हा गगनी येईल साम्राज्य तिमिराचे जाईल
कुणी करंटा इथे न राहील आखील मानव एकच होईल
सत्धर्मांची सद्भावाची जपेल ती जपमाळा ।। ४ ।।

**श्री. मधुकर मुकुंद सवाखंडे**
मुख्याध्यापक शाळा रोडे,
ता. पेण, जि. रायगड



# ★ तृषार्त मी ★

हे स्वप्नीले अवकाश,
तुझ्याच आठवणीच्या तारकानी भरलेल असतं

अगदी काठोकाठ भरलेल्या,
मदिरेच्या नशेभरल्या पेल्याप्रमाणं
मी आठवणीतच दंग असते,

तू असतोस धरेवरी मुक्तपणे विहरत
कधी जाणीव होतें मग तुझ्या अस्तित्वाची
त्यावेळी विरहाचे ढग दाटून येतात,

मग एकच गर्दी होते ह्या आकाशी,
तुझ्या विरहाने आक्रंदणारे हे ढग,
दुःखावेगाने गडगडाट करीत एकमेकावर आपटतात

परंतु तू आपला निश्चित असतोस
तुझं आपलं नेहमीचच तत्व घेवून
गर्जेल तो बरसेल काय म्हणून

**मुरारी प. बिरवाडकर**
मिलिटरी इंजिनिअरींग सर्व्हिसेस
२२५/२ अेन. अे. डी. चुनाभट्टी कॉलनी
करंजा, उरण रायगड ४०० ७०४



# हरवले सूर

जीवनामाजी हरवले सप्तसूर तुझे,
त्यांचा आजही नाद मधुर आहे
हाकिसी कर्तव्यरथा निष्ठेने अखंड परी,
ऊरात दडवलेला तो वेदनेचा तीर आहे ।। धृ ।।

कमल दलावरील ओघळले ते स्फटीक बिंदू
परी वाहतो आहे अखंड अंतरी हा
त्या वहाणाऱ्या वेदनेचा पूर आहे ।। १ ।।

श्रद्धेने ओढता जू अखंड दिनराती,
घेवूनी ऊनवारा पाऊस ऋतु मानापरत्वे
तुला त्या लगडलेल्या, फुलाफुलांचा भार आहे ।। २ ।।

पचवूनी सुःखदुःखाचे कडूगोड प्याले
रचूनी चिता दिलीस आहुती तू प्रेमभावनांची
जो दिसतो आहे तो जळालेल्या
आशेचा धूर आहे ।। ३ ।।

उजाडल्या मैफिलीचा तोच दूरचा नाद आहे
रेटणाऱ्या कर्तव्यरथाला दुःखाचा शाप आहे
ठेवूनी श्रद्धा मनी अखंड वल्हवीत रहा नाव
समोरचा किनारा दूर आहे ।। ४ ।।

हरवलेल्या सप्तसुरांचा आजही नाद मधुर आहे

**मुरारी प. बिरवाडकर**
मिलिटरी इंजिनिअरींग सर्व्हीसेस
२२५/२ अे. अेन. डी. चुनाभट्टी कॉलनी
करंजा, उरण रायगड ४०० ७०४



# अन्नदाता

शेतकरी दादा
मेघ आले रे आकाशाला। सुरूवात झाली पावसाला
पहिल्या झुंजी-मुंजी तो हो उठला,
खिलारी जोडी हो। त्याच्या संगतीला।
नांगरु लागला हो। आपुल्या धरतीला।
जोर चढला बंधूच्या कामाला ॥ १ ॥ शेतकरी दादा
बांधव भगिनी हो। राबती वर्षाला।
रात्र-दिन लावणी हो। करती शेतीला।
वर्ष मध्यावर हो। टाच वसे पोटाला।
अन्न अडते बिचाऱ्या ओठाला ॥ २ ॥ शेतकरी दादा
वर्षांत सुख नाही हो। कष्टी जीवाला।
विसावा नाही हो। थकल्या मनाला।
रात्र-दिन जपतो हो। आपुल्या कामाला।
अंत नाही हो। बंधूच्या कष्टाला ॥ ३ ॥ शेतकरी दादा
धनीक वदती हो। त्या शेतकऱ्याला।
पोसतोस तू बा। जीवी जनतेला।
दिसत नाही हो। कणीक नजरेला।
लाभ होतो का बिच्याऱ्या मुखाला ॥ ४ ॥ शेतकरी दादा
नाही लक्तर हो। त्याच्या अंगाला।
चिंध्या लोबंती हो। क्षीण खांद्याला।
अंतपार नाही हो। उपास मारीला।
देत नाही किंमत हो। तुझ्या कार्याला ॥ ५ ॥ शेतकरी दादा
मेघातून जसे मोती निघाले।
न्याहारीच्या वेळी अश्रु पडले।
गुढग्यात त्याने तोंड लपविले।
कोण पुसे त्याच्या अश्रुला ॥ ६ ॥ शेतकरी दादा

**कमलाकर धावजी घरत**
प्रा. शि. शाळा-रोडे ता. पेण

# ★ एक रात्र ★

हिवाळ्यातील एक रात्र
आभाळाच्या छतावर उतरली
पांढऱ्या शुभ्र धुक्यांचे वस्त्र
धरती माता ल्याली

हिवाळ्यातील एक रात्र
रूपेरी चांदण्याची होती
उबेसाठी ती दोन पाखर
एकमेकांच्या मिठीत होती

हिवाळ्यातील एक रात्र
अंगावर काटे आणणारी
अशीच ती एक
साऱ्यांना थरार करणारी

हिवाळ्यातील एक रात्र
तुझ्या माझ्या हितगुजांची
बाहूपाशात घेऊन तुला
अलिंगन देण्याची होती

**मनोहर काशिनाथ ठाकूर**
सारडे ता. उरण

★ ★ ★ ★

★ ★ ★

★

## ✿✿✿ "ओळख" ✿✿✿

आज आलोच आहे तर तुझ्या दारावरुन जाईन म्हणतो –
ओळख दाखव अस आमचं म्हणणंही नाही ...
आम्हाला पाहून, दचकलीस तरी पुरे ...... पण नाही –
तुझ्या दारावरून जाण्यात धोका आहे ...
तू चुकून ओळख दाखवलीस तर –
तर तू, तू राहणार नाहीस,
अन् मी, मी राहणार नाही ...
तू होतीस तेंव्हा जमीन दिसली
आकाश आम्ही विसरूनच गेलो ... नंतर आम्हास कळलं,
दूरवरच प्रथम पाहून घ्यायचं असतं ...
पण फार उशिर झाला होता –
आम्ही इतके अंध झालो होतो की,
पायाखालच सुद्धा पाहू शकलो नाही ...
आणि म्हणूनच आम्हाला आकाशाचा ह्व्यास असावा ...

**अजित यशवंत बिर्जे**

१०२३ / ३, "साईप्रसाद", अलिबाग - रायगड

## *** किनारा ***

दोन शब्दाचे नाते सांगून मोकळी झालीस 'प्रेम' ...
किनारा दूर असताना, आसमंत पिऊन घेतलास,
तेव्हा म्हणालीस उठ, भरती येतेय ...
मी तसाच बसून राहीलो –
अन् तू दूर निघून गेलीस ... क्षितीजाच्या पलिकडे
समुद्राच्या लाटेसारखी –
अन् मी खडक होऊन पडलोय ...
कित्येक लाटा येतात - भेटतात ...
पण, त्यांच्यात तू नसतेस - हीच समुद्रव्यापी खंत ...

**भालचंद्र भा. वर्तक**

वरसोली, अलिबाग - रायगड

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२६९७
ग्रा. क्र. २६२०६
काव्य २५१३५६०

कलासागरच्या प्रातिनिधीक काव्य संग्रहास

हार्दिक
शुभेच्छा

## आमदार रविंद्रजी राऊत

मु. पो. श्रीवर्धन, जि. रायगड

---

*With Best Compliments From*

# M/s. Mahavir Construction Co.

**ENGINEERS & GOVT. CONTRACTORS**

1 – Sweet Home, Near Court,

Ulhasnagar – 421 003

PHONE – OFF. :– 73090 RESI. :– 72187

कलासागरच्या प्रातिनिधीक काव्य संग्रहास हार्दीक शुभेच्छा !

हार्दिक शुभेच्छा

# यशवंत सहकारी खरेदी व विक्री संघ लि, मुरूड

रजि. नं. केबीओे / एमकेटी / १०३ दिनांक २-१०-६३

मु. पो. ता. जंजिरा - मुरुड, जि. रायगड ४०२४०१

**धान्य, तेल, साखर, कापड इत्यादी जिवनावश्यक वस्तू तसेच खताचा घाऊक व किरकोळ पुरवठा करणारी मुरूड तालुक्यांतील एकमेव सहकारी संस्था**

कुमार स. भाटकर
मॅनेजर

बा. ध. म्हात्रे
चेअरमन

कलासागरच्या प्रातिनिधीक काव्य संग्रहास हार्दीक शुभेच्छा !

---

## रामकृष्ण डेव्हलप्मेंट कॉर्पोरेशन

इमारत बांधकाम व जमीन विकसीत
करण्यातील मुंबईतील प्रख्यात नांव
रायगड जिल्हयात पर्यटक प्रकल्प सुरु होत आहेत

:- संपर्क :-

| | |
|---|---|
| श्री. गं. श्री. सुखटणकर | मुंबई दूरध्वनी |
| द्वारा, हॉटेल सी स्टार | ६३६५६९३ |
| रेवदंडा, ता. अलिबाग | ६३६०२२२ |

---

फोन :– कार्यालय ७ व निवास ७०

राजपुरी गावांतील कोळी बांधवांच्या
जिवनाशी समरस असलेली

**श्री महालक्ष्मी मच्छिमार वि. का. सह. सोसायटी ली.**

मु. पो. राजपुरी, ता. मुरुड, जि. रायगड

| | | |
|---|---|---|
| सि. गो. पाटील | बा. जा. शेंगजी | कृ. बा. गिदी |
| चिटणीस | समिती सदस्य | सभापती |

कलासागरच्या प्रातिनिधीक काव्यसंग्रहास

हार्दिक शुभेच्छा

G. B. M.

# मे. गायकर ब्रदर्स

कॉन्ट्रॅक्टर आणि बिल्डींग मटेरियल सप्लायर्स

## विक्रम इस्पात

मु. मिठेखार, पो. वळके

ता - मुरुड, जि - रायगड

# आत्मनिर्भर भारताचे भवितव्य असे रसायनांच्या हाती अन् एच ओ सी असेल निश्चितच त्या भविष्याची साथी.



एच ओ सी - एक मल्टीयुनिट, मल्टी-टेक्नॉलॉजी उपक्रम - ज्याचे रसायनी (महाराष्ट्र), कोचीन आणि हैदराबाद येथे मिळुन २० हून अधिक प्लांट्स आहेत उद्योगक्षेत्रांच्या विकासासाठी अत्यावश्यक अशा कितीतरी रसायनांचे उत्पादन करून एचओसी वाढत्या उद्योगविश्वाची सेवा बजावते.

**दळणवळण (वाहतूक), अंतराळ, डाईज, ड्रग्ज व फार्मास्युटिकल्स, रसायनिक खते, प्लाय/पल्प बोर्ड, कीटकनाशके, रबर, पेंट, प्लास्टीक, लॅमिनेट्स् इत्यादी.**

एचओसीच्या ह्या प्रगतीचा मूलाधार आहे तिचा कर्मचारी वर्ग. समर्पित, गतिशील आणि बांधिलकीच्या भावनेने भारलेला. आणि तिचे एकमेव उद्दिष्ट आहे भारताची प्रगतिपथावरील वाटचाल अविरत चालू राहाण्यासाठी अत्यावश्यक रसायनांचे उत्पादन.

**सर्वोच्च प्रगतीचा आधार - रसायने.**

**हिंदुस्तान ऑर्गेनिक केमिकल्स लिमिटेड**
(भारत सरकारचा उपक्रम)

**रजि ऑफिस व फॅक्टरी:** रसायनी, जिल्हा-रायगड, महाराष्ट्र ४१० २०७ फोन ४२१-४२६, ४५७-४६०. टेलेक्स. १३०४ २०२.

**मार्केटिंग डिव्हिजन:** हरचंदराय हाऊस, ८१, महर्षी कर्वे मार्ग, मुंबई ४०० ००२. फोन ३१४२७१/७२. टेलेक्स. ०११ ४७०६.

Jyeshta/HOC-3 A/89

With Best Compliments From

Office : 67 22 835 ☎ 48 Murud
Resi : 69 45 29

# KAMAR TALKIES

Murud - Janjina, Raigad

Office :- Menon & Nirmal Industrial Estates,
Near Oshiwara Bridge, Goregaon (W) Bombay 400 062

**K. M. Arekar**
**Manager**

**Messers M. N. Menon**
**Proprietor**

---

# IQBAL MOHD. LALSE

**Director - Asma Real Estate Agents Pvt. Ltd.**

*Bldg. Demolition Contractors*
*Building Cont. & Real Estate*
*Dealers in Old Timber, Iron & Building Materials*

Crystal Commercial Premises
2nd Floor, Room No. 16
Above Hotel Vrindavan
3rd Road, Near Khar Stn.
Bombay - 400 052
Phone C/o 648 11 16
Resi ; 855 55 97

Iqbal Manzil,
Surul Peth Road,
At & Post Nandgaon,
Tal Murud - Janjira,
Dist : Raigad
Phone Off. 48
Resi : 23

कलासागरच्या प्रातिनिधीक काव्यसंग्रहास

## हार्दिक शुभेच्छा

## मुरुड - जंजिरा नगर पालिका परिषद

सु. ग. दिघे — मुख्याधिकारी

कृ. म. आरेकर — अध्यक्ष

## घोले गुरुजी राईस मिल

मेसर्स डॉज ॲन्ड कंपनी

मु. पो. मजगांव, ता. मुरुड, जि. रायगड

लोक सेवेस सदैव तत्पर

## भारतीय स्टेट बँक

शाखा मुरुड - जंजिरा रायगड

फोन ४१

रामचंद्र शहासने प्रबंधक

कलासागरच्या प्रातिनिधीक काव्यसंग्रहास हार्दिक शुभेच्छा

# दि महाड को-ऑप. अर्बन बँक लि. महाड

**मुख्य कचेरी - तांबट आळी, महाड**

**फोन नं. २१७४ व २३१६.**

| शाखा – | श्रीवर्धन | मुरूड | म्हसळा | पोलादपूर | बिरवाडी | पाली |
|---|---|---|---|---|---|---|
| फोन – | १४ | ५५ | ४६ | ५ | ४६ | ७७ |

:X: अधिकाधिक व्याज देणाऱ्या ठेवींच्या निरनिराळ्या योजना.
:X: रू. ३०,०००/– पर्यंतचे ठेवींसाठी विम्याचे संपूर्ण संरक्षण.
:X: लघु उद्योगांना सवलतीच्या दराने कर्ज पुरवठा.
:X: सेफ डिपॉझिट लॉकर्सची उत्तम सोय.
:X: बँकींगचे सर्व व्यवहार केले जातात.

**– ता. २६-१०-९० अखेरची सांपत्तिक स्थिती –**

**( सर्व रूपये लाखांत )**

| १. भाग भांडवल | २. एकूण निधी | ३. ठेवी | ४. खेळतेभांडवल |
|---|---|---|---|
| ३७.४५ | ५७.९७ | ९९९.२१ | १४७५.१९ |

श्री. द. वि. भोसले
व्हा. चेअरमन

श्री. सुधाकर शंकर सावंत ( अॅड. )
चे अ र म न

श्री. ग. रा. भुस्कुटे
मॅनेजर

श्री. नं. सुं. मेहता
ऑ. मॅनेजिंग
डायरेक्टर

श्री. ज. ल. दांडेकर
संचालक
मुरुड

कलासागरच्या प्रातिनिधीक काव्य संग्रहास हार्दीक शुभेच्छा !

---

एक तीळ शेतात पेरला,
रोपाला 'उज्ज्वला' युरिया गावला
झाड चांगल फुलल फळल
सात जणांच पोट भरल.

**राष्ट्रीय केमिकल्स आणि फर्टिलायझर्स लि.**
**थळ युनिट**
**थळ, ता. अलिबाग, जि. रायगड - ४०२ २०८**

---

**:- रायगड जिल्ह्यातील अग्रगण्य सहकारी बँक :-**
**दि गोरेगांव को - ऑपरेटिव्ह अर्बन बँक लि.**
**सेफ डिपॉझीट लॉकर्ससह**

केंद्र कार्यालय : गोरेगांव - रायगड फोन नं. ३०, ७, १ व ११७
शाखा : तळाशेत (इंदापुर), निजामपुर, तळा व माणगांव
फोन नं. : ३६ ३० ३१ १३०

**श्री. आर. पी. दोशी** चेअरमन
**श्री. एस. आर. शेट** मुख्य कार्यकारी अधिकारी
**श्री. एस. पी. मेथा** मॅनेजर

---

*** ग. स. कातकर ***
माजी सभापती, पशु संवर्धन व दुग्ध विकास
रायगड जिल्हा परिषद, अलिबाग
**मु. जसवली, ता. श्रीवर्धन**
**जि. रायगड**

कलासागरच्या प्रतिनिधीक काव्यसंग्रहास हार्दीक शुभेच्छा

---

वसंत भाऊ चौलकर

अध्यक्ष – साईप्रसाद ज्ञानदीप मंडळ, अलिबाग

उपाध्यक्ष – रायगड जिल्हा ज्ञानदीप संघ

कोषाध्यक्ष – रसिक कलामंच अलिबाग

कार्यवाह – कुंभार समाज उन्नती मंडळ, अलिबाग

---

मुरूड, श्रीवर्धन, म्हसळे तालुक्यांतील रहिवाशांची संस्था

अखिल जंजिरा उत्कर्ष मंडळ, मुंबई

कार्यालय

संदीप को. ऑप. हौसिंग सोसायटी

जयप्रकाश नगर, गोरेगांव ( पूर्व )

मुंबई ४०००६३

कार्यवाह

के. पी. दिघे

फोन ६७३४१०३

---

मरियम राईस मिल

मु. पो. शिघ्रे, ता. मुरुड, जि. रायगड

प्रो प्रा. अब्दुल रहिमान बिरवाडकर

---

卐 रमेशचंद्र चत्तरभाणजी जैन 卐

राईस मिल

मु. पो. नादगांव, ता. मुरुड, जि रायगड

---

कलासागरच्या प्रातिनिधीक काव्य संग्रहास हार्दीक शुभेच्छा!

# अब्दुल करीम इस्माईल मोदी

गव्हर्नमेंट कॉन्ट्रॅक्टर
बिल्डींग कॉन्ट्रॅक्टर ॲन्ड मटेरियल सप्लायर्स
मु. विहूर, ता - मुरुड, रायगड

# ★ नवरत्न स्टोन सप्लायर ★

मु. टेंभुडे, ता - अलिबाग
जि - रायगड

# म्युच्युअल ग्रुप बोर्ली

इस्टेट होल्डर
बोर्ली मांडला, ता. मुरूड, रायगड
प्रोप्रा. श्री. गोरेगांवकर

कलासागरच्या प्रातिनिधीक काव्य संग्रहास हार्दीक शुभेच्छा !



# एम्. जी. महाडिक

गव्हर्मेंट रजिस्टर्ड कॉन्ट्रॅक्टर

नोंदणी वर्ग ४ क्र. ३ सन ८५-८६

मु. बारशीव, पो. बोर्ली - मांडला

ता. मुरुड - जंजिरा, जि. रायगड

बोर्ली - मांडला फोन ३७

REFBK-0026276

REFBK-0026276

SL ☎ २५२० निवास २१२०

# सागर लॉज

जे. एस. एम. कॉलेज शेजारी

अलिबाग, रायगड

वैशिष्टये :-

- हवेशीर डबल बेडरूम
- सर्व रूम अटॅच बाथ व अटॅच बाल्कनी
- तत्पर सेवा, अनुभवी मॅनेजमेंट
- शहरांतील मध्यवर्ती ठिकाण
- समुद्रकिनारा अतिशय जवळ
- २४ तास थंड व गरम पाण्याची सोय

कलासागरच्या प्रातिनिधीक काव्यसंग्रहास

हार्दिक शुभेच्छा

# रायगड जिल्हा
# मध्यवर्ती सहकारी बँक लि. पेण

केंद्रकार्यालय - पेण

तार :- सागर बँक ☎ पेण ५२

* रायगड जिल्हयांतील शेतकरी, कारागीर व मध्यम वर्गियांना आमच्या ३९ शाखामार्फत सहकारी माध्यमाद्वारे आवश्यक कर्ज पुरवठा.

* ग्रामीण भागांतील, व शहरी भागांतील खातेदारांना बँकींगची सौहार्दपुर्ण सेवा

* जनतेच्या आमच्यावर असलेल्या विश्वासाचे प्रतिक म्हणजे ठेवींमध्ये लक्षणीय वाढ.

एस. व्ही. पाटील
प्रभारी सरव्यवस्थापक

रा. गो. खेडेकर
व्हा. चेअरमन

चं. खं. देशमुख
चेअरमन